## दीर्घ मुदती अंदाजाची उपयोगिता (4 आठवड्यासाठी)

* ओलीत / सिंचन व्यवस्थापन
* फवारणी चे नियोजन
* विविध फळ झाडांच्या फळांच्या काढणी चे नियोजन
* मातीतील ओलावा टिकवून ठेवण्याकरिता (आच्छादन)

## हंगामी हवामान अंदाजाची उपयोगिता (खरीप, रब्बी, व उन्हाळी हंगाम)

* संबंधित क्षेत्रातील हवामानानुसार पिक पध्दती निवडणे
* सिंचन पध्दतीची निवड करण्यासाठी
* धान्याचे अल्पकालीन साठवण करण्यासाठी
* चारा उत्पादन व व्यवस्थापन करण्यासाठी

## शेतकरी जगजागरुकता कार्यक्रम

शेतकरी बांधवां मध्ये कृषि हवामान माहिती व जनजागृती चा अभाव राहिल्याचे शेतकऱ्यांचे पिक नुकसान होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. हि बाब लक्षात घेता कृषि विज्ञान केंद्र, दुर्गापूर (बडनेरा) अमरावती येथील प्रमुख कृषि हवामान विषय विशेषज्ञ आणि इतर कृषि विषय विशेषज्ञद्वारे गावपातळीवर शेतकरी जगजागरुकता कार्यक्रमाचे आयोजन करुन शेतकर्यांना कृषि व्यवसायामध्ये हवामान अंदाजाचे महत्व पठवून दिले जाते तसेच शेतकऱ्यांच्या शेतावर घेतल्या जाणाऱ्या पिकांच्या समस्या विषयी थेट संवाद साधला जातो. शेतकरी जागरुकता कार्याक्रमा अंतर्गत शेतकऱ्यांच्या मोबाईल नंबरची नोंदणी करुन त्यांना संबंधित तालुक्याच्या व्हाटसॲप ग्रुपमध्ये सामील करुन घेतले जाते, जेणेकरुन ते घर बसल्या हवामानाची माहिती मिळवू शकतील

या योजनेचा लाभ घेण्याकरीता अमरावती जिल्यातील शेतकर्यांनी कृषि विज्ञान केंद्र, दुर्गापूर (बडनेरा) अमरावती अंतर्गत जिल्हा कृषि हवामान केंद्र येथे भेट देऊन किंवा दिलेल्या नंबर व संपर्क करुन निशुल्क नोंदणी करु शकता.


**कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर (बडनेरा), जि. अमरावती.**

Email : pckvkda2015@gmail.com

www.kvkdurgapur.in 0721-2580342


Sadhana Printings

श्रम साधना,अमरावती

# कृषी विज्ञान केंद्र

दुर्गापूर (बडनेरा),जि.अमरावती.

भाकृअनुप ICAR

श्रमसाअम SSAMT

## ग्रामीण कृषी मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र याचे महत्व

अंतर्गत

# जिल्हा कृषि हवामान केंद्र (DAMU)


संपादक व प्रकाशक

डॉ. के.ए.धापके

वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख

- लेखन व संकलन -

डॉ. एस जी मुंढे
विषय विशेषज्ञ (कृषि हवामान शास्त्र)
मो. नं. 7620877237

कु. व्हि.बि. पोहरे
कृषि हवामान निरिक्षक




## ग्रामीण कृषी मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र याचे महत्व

भारतीय शेती हि शतकानुशतके हवामानावर अवलंबून आहे. पण मागच्या काही वर्षांपासून हवामानाची अनिश्चितता देशातील शेतकरी व्यवसायासाठी धोकादायक बनत चाललेली आहे. हवामान बदलामुळे शेतकरी बांधवाना अनेक आपत्तींना जसे कि अतिवृष्टी, चक्री वादळे, अति थंडी, अति तापमान, गारपीट आणि दुष्काळ या सारख्या घटकांचा पिक उत्पादनावर अनिष्ट परिणाम दिसून येत आहेत. आपले शेतकरी खरीप हंगामापूर्वी नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे पडणार्या पावसाची आतुरतेने वाट पाहत असतो. हवामान अंदाजाचा उपयोग फक्त पेरणी करिता मर्यादित नसून तो अंदाज शेतमालासक प्रत्येक कामात उपयुक्ततेचा असतो. थोडक्यात सांगयाचे झाले तर अगदी शेत नागरणीपासून ते शेतमाल बाजारपेठेत पोहचेपर्यंत शेतकरी बांधवाचे नुकसान कमी करण्याकरीता भारतीय हवामान विभाग ग्रामीण कृषि मौसम सेवा या योजनेअंतर्गत सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत.

## ग्रामीण कृषि मौसम सेवा

सधस्थितीत सातत्याने होणार्या हवामानातील बदलामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्यामुळे शेती उत्पादनात घट होत आहे. यात बदलत्या हवामानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत वेळेत न पोहोचणे हे देखील मुख्य कारण आहे. दैनंदिन हवामान व पिक उत्पादनाविषयी हवामान आधारित मार्गदर्शन वेळत पुरवण्याकरिता भारतीय हवामान विभाग, नवी दिल्ली व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमानाने ग्रामीण कृषि मोसम सेवा या योजने अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, दुर्गापूर (बडनेरा) अमरावती. येथे जिल्हा कृषि हवामान केंद्र सुरु करण्यात आले आहे. यामुळे हवामान घटकांची दैनंदिन माहिती संकलित केली जाईल आणि भारतीय हवामान विभाग कडून व प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर कडून देण्यात येणाऱ्या सुधारित हवामानाच्या अंदाजाच्या आधारे दर मंगळवार व शुक्रवार या दिवसी कृषि विज्ञान केंद्र, दुर्गापर (बडनेरा) अमरावती. येथील सर्व कृषि विषयविशेष तज्ञ, जिल्ह्यातील कृषि आणि पशुसंवर्धन विभागातील अधिकारी यांच्या मार्गदर्शनाद्वारे कृषि सल्ला शेतकऱ्यांपर्यंत पुरवला जात आहे

### जिल्हा व तालुकस्थरीय कृषि सल्ला तयार करण्याची प्रक्रिया

↓

दर मंगळवार व शुक्रवार ला प्रादेशिक मौसम विभाग, नागपूर यांच्या कडून प्राप्त हवामान अंदाज नुसार

↓

जिल्हा कृषि हवामान केंद्र येथील तज्ञ समितीची बैठक

↓

जिल्यातील प्रमुख पिकांविषयी हवामान आधारित कृषि सल्ला तयार केला जातो.

↓

कृषि सल्ला पत्रिकेचे प्रसारण

↓

जिल्हा व तालुका कृषि कार्यालये तसेच कृषि संबंधित सामाजिक संस्थाना ई-मेल द्वारे शेतकर्यांना आकाशवाणी दुरदर्शन, प्रचार व वृत्तपत्रे आणि व्हाटसऑप ग्रुप द्वारे

## हवामान आधारित कृषि सल्ला पत्रिकेतील समाविष्ट घटक




* मागील पाच दिवसाचा हवामान अंदाज
* पुढील पाच दिवसाचा हवामान अंदाज
* जमिनीची निवड व खत व्यवस्थापन
* हवमान अंदाजानुसार पिक व वाण निवड
* योग्य वेळेत पेरणी व पिक पध्दतीविषयी मार्ग दर्शन
* पिक वाढीच्या अवस्थेनुसार मार्गदर्शन
* कीड व रोग व्यवस्थापन
* पशुसंवर्धन व कुकुट पालन विषयी मार्गदर्शन
* भाजीपाला पिके व फळझाडाविषयी मार्गदर्शन व सल्ला
* विजांपासून बचावासाठी दामिनी ॲप चा वापर करावा याची माहिती
* जिल्हा हवामान केंद्राची माहिती मिळव्यासाठी व हवामान घटक, पिक सल्ला मोबाईल वर मिळवण्या करिता मेघधूत ॲप वापर या विषयी माहिती आणि सल्ला.

### लघु मुदती हवामान अंदाजाची उपयोगिता (24 ते 48 तासासाठी)

* पिकांना ओलीत करायचे का नाही हे ठरवण्यासाठी
* शेतामधील कामांचे व्यवस्थापन करण्यासाठी
* रोग व किडी करिता फवारणी करायची का नाही ठेरण्याकरीता
* पिकांची कापणी या सुरक्षित ठिकाणी माल ठेवण्याकरीता
* काढणी केलेला भाजीपाला व फळे सुरक्षित ठिकाणी ठेवण्याकरिता
* पशु व पक्षांना सुरक्षित जागी ठेवण्याकरिता

### मध्यम मुदती हवामान अंदाजीची उपयोगिता (3 ते 10 दिवसासाठी)

* फवारणीचे प्रभावी नियोजन करणे
* शेतमजुरांचे व्यवस्थापन करणे
* सिंचनाचे/ ओलीत व्यवस्थापन करणे
* गुरांसाठी चार व पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन करणे
* परीक्व अवस्थेत असलेल्या पिकांची कापणी करायची का नाही हे ठरविणे
* काढणी व मळणी केलेले धान्य वाळवण




# "आजादी का अमृत महोत्सव"

# "Azadi ka #Amrit Mahotsav"


## कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर (बडनेरा), जि. अमरावती.

Email : pckvkda2015@gmail.com www.kvkdurgapur.in 0721-2580342